# वसई-विरार शहर महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

दि :-११/११/ २०२०

**विषय :- दीपावली उत्सव २०२० मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन गृह विभाग, मंत्रालय यांचे पत्र दि.०५ नोव्हेंबर २०२०.**

## परिपत्रक

कोव्हिड - १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षीचा दीपावली उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. त्या अनुषंगाने खालीप्रमाणे मार्गदर्शक सुचना देत आहे.

१) राज्यात तसेच मोठया शहरांमध्ये अद्यापही कोरोना रुग्ण मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत. चालू वर्षी कोव्हिड या संसर्गजन्य रोगाचा झालेला प्रादुर्भाव विचारात घेऊन गेल्या ७-८ महिन्यात आलेले सर्वधर्मीय सण /उत्सव अत्यंत साध्या पध्दतीने व लोकांनी एकत्रित न येता साजरे केले आहेत. या वर्षीचा दीपावली उत्सव कोविड कालावधीत साजऱ्या केलेल्या अन्य उत्सवांप्रमाणेच पूर्ण खबरदारी घेऊन अत्यंत साध्या पध्दतीने साजरा करावा.

२) कोव्हिड संसर्गामुळे बंद करण्यांत आलेली राज्यातील धार्मिक स्थळे अद्याप खुली करण्यांत आलेली नाहीत. त्यामुळे साजरा केला जाणारा दीपावली उत्सव घरगुती स्वरुपात मर्यादित राहिल, याची दक्षता घेण्यांत यावी. उत्सव कालावधीत नागरिकांनी विशेष करुन जेष्ठ नागरिक तसेच लहान बालके यांनी घराबाहेर पडणे शक्यतो टाळावे. तसेच नागरिकांनी गर्दी टाळावी व मोठया प्रमाणात एकत्रित येऊ नये. मास्कचा वापर आणि सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे, जेणेकरुन कोरोनाचा संसर्ग / संक्रमण वाढणार नाही.

३) दीपावली हा दिव्यांचा तसेच प्रकाशाचा उत्सव मानला जातो. या उत्सवाच्या दरम्यान दरवर्षी मोठया प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यांत येते. त्यामुळे वायु व ध्वनी प्रदुषणाची पातळी वाढून जनसामान्यांच्या तसेच प्राणीमात्रांच्या आरोग्यावर होणारे विपरित परिणाम दीपावली उत्सवानंतर बराच कालावधीपर्यंत दिसून येतात. कोरोना आजारामुळे परिणाम झालेल्या अनेकांना फटाक्यांच्या धुरामुळे वायू प्रदुषणाचा थेट परिणाम होऊन त्रास होण्याची भिती आहे. ही बाब विचारात घेऊन नागरिकांनी चालू वर्षी फटाके फोडण्याचे टाळावे, त्याचा त्रास होऊ शकतो. त्याऐवजी दिव्यांची आरास मोठया प्रमाणावर करुन उत्सव साजरा करावा.

४) या उत्सवादरम्यान कोणत्याही प्रकारे सार्वजनिक उपक्रम / कार्यक्रम उदा. दिवाळी पहाट आयोजित करण्यांत येऊ नयेत. आयोजित करावयाचे झाल्यास ऑन लाईन, केबल नेटवर्क इ. माध्यमांद्वारे त्याचे प्रसारण करावे.

५) सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम / शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यांत यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यांत यावी. मात्र याठिकाणी देखील लोकांनी एकाचवेळी मोठया प्रमाणावर एकत्रित येऊ नये, याची दक्षता घेण्यांत यावी.

Scanned with CamScanner

६) कोव्हिड - १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच महानगरपालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी वेळोवेळी केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहिल. तसेच या परिपत्रकानंतर प्रत्यक्ष उत्सव सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत काही सुचना नव्याने प्रसिध्द झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.

११/११/२०२०.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner